सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९३९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९

# मुंबई गॅस पुरवठा अधिनियम, १९३९

(दिनांक १३ नोव्हेंबर, २००६ पर्यंत सुधारित)

**BOMBAY ACT No. IX OF 1939**

# THE BOMBAY GAS SUPPLY ACT, 1939

**(As modified upto the 13th November, 2006)**

व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६ यांच्याद्वारे भारतात मुद्रित
आणि संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य,
मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित
२००६

[किंमत : ५.८० रुपये]

SCH) 734

# मुंबई गॅस पुरवठा अधिनियम, १९३९

## अनुक्रमणिका

उद्देशिका

कलमे


| कलमे | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ | .. | १ |
| २. | व्याख्या | .. | २ |
| ३. | कंपनीने प्रतिवर्षी हिशोब तयार करणे व सादर करणे | .. | २ |
| ४. | हिशोबांची तपासणी | .. | ३ |
| ५. | सल्लागार समिती | .. | ३ |
| ६. | दरांच्या मर्यादा विहित करण्याबाबत नियम | .. | ४ |
| ७. | मर्यादेच्या बाहेर असलेले दर न आकारणे व वसूल न करणे | .. | ४ |
| ७-क. | गॅसचा पुरवठा कोणत्या दाबाखाली करण्यात आला पाहिजे | .. | ४ |
| ७-ख. | तपासणी व परीक्षा यांसाठी सवलती | .. | ४ |
| ७-ग. | कंपनीने उपकरणे ठेवणे | .. | ४ |
| ७-घ. | यथाप्रमाण दाबाने गॅसचा पुरवठा करण्यात कसूर केल्याबद्दल तक्रार | .. | ५ |
| ७-ङ | बसविलेल्या जोडकामात ग्राहकाने वाढ करण्याबाबत कंपनीची संमती आवश्यक | .. | ५ |
| ७-च. | कंपनीने मापयंत्रे पुरविणे | .. | ५ |
| ७-छ. | नवीन संयोजने (कनेक्शन्स) नियमास अनुसरून असणे | .. | ५ |
| ७-ज. | चुकीच्या मापयंत्राविषयी तक्रार | .. | ५ |
| ७-झ. | विवाद निरीक्षकाकडे पाठविणे | .. | ६ |
| ७-ञ. | कंपनीस येणे असलेल्या आकारांची व भाड्याची वसुली | .. | ६ |
| ७-ट. | निरीक्षकाच्या कामाबद्दल फी | .. | ६ |
| ७-ठ. | ग्राहकाने निरीक्षकाची फी देण्यात केलेली कसूर | .. | ७ |

## अनुक्रमणिका-चालू

उद्देशिका

कलमे


| | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| ७-ड. | ग्राहकांची यादी | .. | ७ |
| ७-ढ. | निरीक्षकाने ग्राहकास निदेश देणे | .. | ७ |
| ७-ण. | निरीक्षकाची नेमणूक | .. | ७ |
| ७-त. | निरीक्षकाच्या निर्णयावर अपील | .. | ८ |
| ८. | कंपनीने उल्लंघन केल्याबद्दल शिक्षा | .. | ८ |
| ९. | कंपनीने कसूर केल्याबद्दल प्रमुख अधिकारी जबाबदार असणे | .. | ८ |
| ९-क. | ग्राहकाने कसूर केल्याबद्दल शिक्षा | .. | ८ |
| ९-ख. | निरीक्षक हा लोकसेवक असणे | .. | ८ |
| ९-ग. | दावे व खटले याबाबत निस्तारण | .. | ८ |
| १०. | गॅस तयार करणाऱ्या किंवा त्याचा पुरवठा करणाऱ्या व्यक्तींना प्रस्तुत अधिनियम लागू करणे | .. | ९ |
| ११. | नियम | .. | ९ |

# सन १९३९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९[1]

## [मुंबई गॅस पुरवठा अधिनियम, १९३९]*

[१७ मे १९३९]

ह्या अधिनियमात पुढील आदेश व अधिनियम या अन्वये अनुकूलन, रूपभेद व सुधारणा करण्यात आले आहेत :—

सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक १३.

विधि अनुकूलन आदेश, १९५०.

विधि अनुकूलन आदेश, १९५६.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५१

विधि अनुकूलन आदेश, १९६०

### मुंबई प्रांतात [2][गॅसच्या पुरवठ्याचे व त्याबद्दल आकारावयाच्या दरांचे] नियमन करण्याची तरतूद करण्याबाबत अधिनियम

**ज्याअर्थी,** मुंबई प्रांतात [2][गॅसच्या पुरवठ्याचे व त्याबद्दल आकारावयाच्या दरांचे] नियमन करण्यासाठी व इतर काही गोष्टींसाठी तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** या अन्वये पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात आला आहे :—

**१.** (१) या अधिनियमास मुंबई गॅस पुरवठा अधिनियम, १९३९ असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

[3][(२) तो सबंध [4][महाराष्ट्र राज्यास] लागू होईल.]

---

[1] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी, मुंबई शासन राजपत्र, १९३९, भाग-५, पृष्ठ १६५, किंवा मुंबई विधानसभा वादविवाद, १९३९, खंड ५, ३६८८, किंवा मुंबई विधानपरिषद वादविवाद, १९३९ खंड-६, पृष्ठ ७८० पहा. विधानसभेतील कामकाजाकरिता, मुंबई विधानसभा वादविवाद, १३९ खंड ५ पृष्ठ ३१९३-३२०१ व विधानपरिषदेतील कामकाजाकरिता, मुंबई विधानपरिषद वादविवाद, १९३९, खंड ६, पृष्ठ ६२६-६३१ पहा.

[2] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५१, कलम ४ (१) द्वारे मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[4] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

* हा अधिनियम, सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५१, याच्या निकटपूर्वी मुंबई राज्याच्या ज्या भागास लागू नव्हता त्या भागास लागू करण्यात येत आहे. (सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५१, कलम (३) पहा.)

(३) तो [1][राज्य] सरकार, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे याबाबत [2][पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्याच्या बाबतीत जो दिनांक नेमील त्या दिनांकास अंमलात येईल आणि गॅस कंपन्या अधिनियम, १८६३ आणि मुंबई गॅस पुरवठा अधिनियम, १९३९ (व्याप्ती वाढविण्याबाबत) अधिनियम, १९५८ यान्वये तो मुंबई राज्याच्या ज्या भागास लागू करण्यात आला असेल त्या भागात, ते सरकार त्याच रीतीने प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे नेमील अशा इतर दिनांकास तो अंमलात येईल.]

व्याख्या.

**२.** विषयात किंवा संदर्भात एतद्विरुद्ध काही नसल्यास, या अधिनियमात, —

(१) "कंपनी" या संज्ञेचा अर्थ, गॅस कंपनी अधिनियम, १८६३ जीला लागू आहे अशी मुंबई गॅस कंपनी, लिमिटेड किंवा ह्या अधिनियमाच्या तरतुदी त्या त्या वेळी कलम १० अन्वये ज्यास लागू करण्यात आल्या असतील अशी कोणतीही इतर व्यक्ती असा समजावा आणि त्यात अशा कंपनीचे किंवा व्यक्तीचे उत्तराधिकारी व अभिहस्तांकिती (असैन्स) यांचा समावेश होतो;

(२) "ग्राहक म्हणजे ज्यास कंपनीकडून गॅसचा पुरवठा केला जातो अशी कोणतीही व्यक्ती;

(३) "विहित" म्हणजे या अधिनियमान्वये केलेल्या नियमांनी विहित केलेले;

[3][(४) "निरीक्षक" म्हणजे कलम ७-ण अन्वये राज्य सरकारकडून नेमण्यात आलेला गॅस निरीक्षक;

(५) "उष्णतामूल्य (कॅलरिफिक व्हॅल्यू)" या संज्ञेचा अर्थ, तीस इंच पाऱ्याच्या दाबाखाली साठ अंश उष्णतामान असताना मोजून घेतलेला एक घनफूट गॅस जाळून निर्माण झालेली व निदेशात निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही विशिष्ट कंपनीकडून किंवा कोणत्याही वर्गातील कंपनीकडून पुरवठा करण्यात आलेल्या गॅसच्या संबंधात राज्य सरकारकडून अशा निदेशात अन्यथा फर्माविण्यात येईल ते खेरीज करून, जलबाष्पपरिप्लुत अशी ब्रिटिश उष्म परिमाणांची (स्थूल) संख्या असा समजावा;]

कंपनीने प्रतिवर्षी हिशोब तयार करणे व सादर करणे.

**३.** (१) कंपनीने, प्रतिवर्षी, विहित केलेल्या दिनांकास किंवा दिनांकापूर्वी आपल्या उपक्रमाच्या (अंडरटेकिंग) हिशोबांचे एक पत्रक तयार करून ते [1][राज्य] सरकारकडे किंवा [1][राज्य] सरकार याबाबत नेमील अशा अधिकाऱ्याकडे सादर केले पाहिजे; असे पत्रक याबाबत विहित करण्यात येईल अशा मुदतीपुरते, अशा दिनांकापर्यंत बनविलेले व अशा नमुन्याप्रमाणे असले पाहिजे व त्यात विहित करण्यात येईल असा तपशील असला पाहिजे.

(२) कंपनीने हिशोबाच्या अशा पत्रकाच्या प्रती आपल्या कचेरीत ठेवल्या पाहिजेत व विहित करण्यात येईल अशा किंमतीहून अधिक नसलेल्या किंमतीस कोणत्याही अर्जदारास त्या विकल्या पाहिजेत.

---

[1] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५१, कलम ४ (१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम ३ अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

**हिशोबांची तपासणी.**

४. (१) कलम ३ अन्वये उपक्रमाच्या हिशोबांचे पत्रक सादर करण्यापूर्वी ते राज्य सरकार याबाबत नेमील किंवा पसंत करील अशा व्यक्तीकडून तपासण्यात आले पाहिजे असा निदेश देण्याचा राज्य सरकारास अधिकार आहे.

(२) हिशोबतपासनवीसाचे पारिश्रमिक [1][राज्य] सरकार निर्दिष्ट करील इतके असले पाहिजे आणि त्याचे पारिश्रमिक व त्याने आपली कर्तव्ये बजावण्याच्या कामी किंवा त्यासंबंधात [1][राज्य] सरकार मंजूर करील इतक्या रकमेपर्यंत केलेला सर्व खर्च ह्याची रक्कम मागणी करताच कंपनीने दिली पाहिजे.

(३) हिशोब तपासणीच्या कारणासाठी आवश्यक असतील अशी अशा उपक्रमासंबंधी सर्व पुस्तके व दस्तऐवज ही, कंपनीने हिशोबतपासनवीस, त्याचे लिपिक व सहायक यास पाहू दिली पाहिजे; आणि फर्माविण्यात येईल तेव्हा, कंपनीने अशा कारणासाठी आवश्यक असलेली सर्व प्रमाणके (व्हौचर्स) व माहिती ही, हिशोबतपासनवीस, त्याचे लिपिक व सहायक यास पुरविली पाहिजेत व तसेच त्यांना आपली कर्तव्ये योग्य रीतीने बजावता यावी यासाठी आवश्यक असलेल्या सर्व सोई करून दिल्या पाहिजेत.

(४) हिशोब तपासणीचे काम [1][राज्य] सरकार निर्दिष्ट करील अशा रीतीने केले पाहिजे व चालविले पाहिजे.

(५) याबाबत [1][राज्य] सरकार ठरविल अशा मुदतीच्या आत हिशोबतपासनवीसाच्या पारिश्रमिकाची व त्याने केलेल्या खर्चाची रक्कम देण्यात कंपनी कसूर करील तर ती, कंपनीकडून जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करता येईल.

**सल्लागार समिति.**

५. (१) [1][राज्य] सरकारास, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, सल्लागार समितीची रचना करण्याचा अधिकार आहे.

(२) अशी सल्लागार समिति ही, सभापती व निदान दोन इतर सदस्य यांची मिळून झालेली असेल.

(३) [1][राज्य] सरकारास, सामान्य किंवा विशेष आदेश देऊन पुढील गोष्टी करण्याचा अधिकार आहे :—

(१) समितीचे अधिकार व कर्तव्य ठरविणे व तिच्या कार्यरीतीचे नियमन करणे.

(२) समितीच्या सदस्यांच्या पदाचा अवधी ठरविणे, आणि

(३) समितीच्या कोणत्याही सदस्यास, त्याच्या कर्तव्याच्या बजावणीच्या संबंधात फी देण्याविषयी व अशा कामी त्याने केलेला प्रवास खर्च देण्याविषयी निदेश देणे.

---

[1] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

दरांच्या मर्यादा विहित करण्याबाबत नियम.

६. राज्य सरकारास, सल्लागार समितीच्या शिफारशीस अनुसरून, सबंध [1][महाराष्ट्र राज्या-[2][च्या] ]किंवा कोणत्याही निर्दिष्ट क्षेत्रात कोणत्याही ग्राहकास किंवा कोणत्याही वर्गाच्या ग्राहकांना गॅसचा पुरवठा करण्याबद्दल कंपनीस ज्या दराने आकार घेता येईल त्या दरांच्या मर्यादा विहित करण्याबाबत वेळोवेळी नियम करण्याचा अधिकार आहे.

मर्यादेच्या बाहेर असलेले दर न आकारणे व वसूल न करणे.

७. कोणत्याही करारांत किंवा विधीत काहीही असले तरी, कंपनीने, कोणत्याही वेळी, कोणत्याही ग्राहकास गॅसचा पुरवठा केल्याबद्दल त्याच्याकडून कलम ६ अन्वये केलेल्या नियमांनी याबाबत विहित केलेल्या मर्यादेहून अधिक दराने आकार घेता कामा नये किंवा तो त्याच्याकडून वसूल करता कामा नये.

गॅसचा पुरवठा कोणत्या दाबाखाली करण्यात आला पाहिजे.

[3][**७-क.** कंपनीने ग्राहकास पुरविलेला गॅस हा, तिच्या आटोक्याबाहेर जे कोणतेही कारण असेल ते खेरीज करून, उष्णतामूल्य, दाब व शुद्धता यांच्याबाबतीत राज्य सरकार राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे निर्दिष्ट करील अशा प्रमाणाचा असला पाहिजे; मात्र अशा प्रमाणाच्या बाबतीत अशा रीतीने निर्दिष्ट करण्यात येईल अशी सूट देता येईल. अशा रीतीने निर्दिष्ट केलेल्या प्रमाणात वेळोवेळी बदल होऊ शकेल व ते प्रमाण निरनिराळ्या स्थानांच्या किंवा क्षेत्रांच्या बाबतीत निरनिराळे असू शकेल.

तपासणी व परीक्षा यासांठी सवलती.

**७-ख.** कंपनीने, सर्व वेळी, निरीक्षकाला किंवा त्याने याबाबत लेखी अधिकृत केलेल्या त्याच्या मदतनीसांना, ग्राहकांना पुरविण्यात येणाऱ्या गॅसचे उष्णतामूल्य, दाब व शुद्धता ठरविण्याच्या कारणासाठी, तिच्या कारखान्यांपैकी कोणत्याही कारखान्याची तपासणी व परीक्षा करण्यासाठी सर्व प्रकारच्या सवलती दिल्या पाहिजेत.

**स्पष्टीकरण.**—ह्या कलमात, "कारखाना" या संज्ञेत गॅस पुरवण्यासाठी आवश्यक असलेल्या कोणत्याही इमारती, यंत्रसामग्री व उपकरणे यांचा समावेश होतो.

कंपनीने उपकरणे ठेवणे.

**७-ग.** ग्राहकांना पुरवठा करण्यात येत असलेल्या गॅसचे उष्णतामूल्य, दाब व शुद्धता अचूक ठरविण्याकरिता व मापयंत्रे (मीटर) बिनचूक आहेत की नाहीत हे परीक्षा करून पाहण्याकरिता निरीक्षकास आवश्यक वाटतील अशी मापनयंत्रे व अनुलेखकयंत्रे व उपकरणे कंपनीने ठेवली पहिजेत व ती सुस्थितीत राखली पाहिजेत. अशी यंत्रे व उपकरणे निरीक्षकास व त्याच्या कोणत्याही मदतनीसास त्यांची तपासणी व परीक्षा करण्यासाठी सर्व वेळी खुली असली पाहिजेत.

---

[1] विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० द्वारे मूळ मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९५८ चा मुंबई अधिनियम, क्रमांक ५१, कलम ४ (२) अन्वये मूळ मजुकराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम ४ अन्वये कलमे ७-क ते ७-त जादा दाखल करण्यात आली.

**७-घ.** (१) ग्राहकाला, आपणास पुरवठा करण्यात येत असलेला गॅस हा, निर्दिष्ट करण्यात आलेल्या उष्णतामूल्याच्या किंवा दाबाच्या किंवा शुद्धतेच्या प्रमाणापेक्षा कमी प्रमाणाचा आहे अशी कंपनीकडे लेखी तक्रार करण्याचा अधिकार आहे आणि कंपनीने अशी तक्रार आल्यापासून अठ्ठेचाळीस तासांच्या आत, ग्राहकाच्या समक्ष किंवा ग्राहकाची तशी इच्छा असल्यास त्याच्या प्रतिनिधीच्या समक्ष, पुरवठा करण्यात येत असलेल्या गॅसच्या उष्णतामूल्याची किंवा दाबाची किंवा शुद्धतेची परीक्षा केली पाहिजे आणि निर्दिष्ट करण्यात आलेली सूट लक्षात घेता, पुरवठा करण्यात येत असलेला गॅस जर अशा प्रमाणापेक्षा कमी प्रमाणाचा असल्याचे आढळून येईल तर, अशी परीक्षा केल्यापासून अठ्ठेचाळीस तासांच्या आत किंवा निरीक्षक परवानगी देईल अशा अधिक मुदतीच्या आत, यथास्थिति असे उष्णतामूल्य, दाब किंवा शुद्धता प्रमाणाबरहुकूम आणली पाहिजे.

यथाप्रमाण दाबाने गॅसचा पुरवठा करण्यात कसूर केल्याबद्दल तक्रार.

(२) अशी परीक्षा केल्यानंतर ज्या प्रमाणाविषयी तक्रार करण्यात आली होती ते प्रमाण बिनचूक असल्याचे आढळून येईल तर, विहित करण्यात येईल अशा रकमेपेक्षा अधिक नाही असा परीक्षा केल्याबद्दलचा आकार अशा ग्राहकाकडून वसूल करण्याचा कंपनीस हक्क असेल.

**७-ङ.** कोणत्याही ग्राहकाने, कोणत्याही वेळी, कंपनीस कळविल्यावाचून व तिची संमती घेतल्यावाचून, बसविलेल्या आपल्या गॅसच्या जोडकामात (इन्स्टॉलेशन) वाढ करता कामा नये.

बसविलेल्या जोडकामात ग्राहकाने वाढ करण्याबाबत कंपनीची संमती आवश्यक.

**७-च.** कंपनीने, प्रत्येक ग्राहकास, त्यास पुरविण्यात येणाऱ्या गॅसची मोजणी करण्यासाठी बिनचूक असे मापयंत्र पुरविले पाहिजे व ते सुस्थितीत राखले पाहिजे.

कंपनीने मापयंत्रे पुरविणे.

**७-छ.** याबाबत राज्य सरकार जे नियम करील ते पाळल्यावाचून कंपनीने, कोणत्याही व्यक्तीला गॅसचा पुरवठा करण्यासाठी नवीन संयोजन (कनेक्शन) देता कामा नये.

नवीन संयोजने (कनेक्शन्स) नियमास अनुसरून असणे.

**७-ज.** (१) ग्राहकाला, आपणांस पुरवण्यात आलेले मापयंत्र बिनचूक नसल्याबद्दल कंपनीकडे लेखी तक्रार करता येईल; आणि कंपनीने, अशी तक्रार मिळाल्यापासून अठ्ठेचाळीस तासांच्या आत, ग्राहकाच्या समक्ष किंवा ग्राहकाची तशी इच्छा असल्यास त्याच्या प्रतिनिधीच्या समक्ष, मापयंत्राची परीक्षा केली पाहिजे आणि मापयंत्र बिनचूक नसल्याचे आढळून आले तर, तिने लगतपुढील अठ्ठेचाळीस तासांच्या आत किंवा निरीक्षक परवानगी देईल अशा अधिक मुदतीच्या आत चुकीचे मापयंत्र काढून त्या जागी एक बिनचूक मापयंत्र बसविले पाहिजे.

चुकीच्या मापयंत्राविषयी तक्रार.

(२) अशी परीक्षा केल्यानंतर मापयंत्र बिनचूक असल्याचे आढळून येईल तेव्हा, कंपनी लेखी मागणी करील तर, तिला विहित करण्यात येईल अशा रकमेहून अधिक नाही असा परीक्षा केल्याबद्दलचा आकार ग्राहकास द्यावा लागेल.

**स्पष्टीकरण.**— ह्या कलमाच्या प्रयोजनांकरिता मापयंत्र बिनचूक मापापेक्षा दर शेकडा ३ (तीन) पेक्षा अधिक किंवा कमी असे गॅसचे माप दाखवीत नसेल तर, ते बिनचूक आहे असे समजण्यात आले पाहिजे.

विवाद निरीक्षकाकडे पाठविणे.

**७-झ.** (१) वापरलेल्या गॅसचे परिमाण, गॅस पुरविल्याबद्दल कंपनीने आकारलेली कोणतीही रक्कम, उष्णतामूल्याची, दाबाची किंवा शुद्धतेची परीक्षा किंवा मापयंत्राची परीक्षा याबाबत ग्राहक व कंपनी यांमध्ये कोणताही विवाद उद्‌भवेल तेव्हा, दोहोंपैकी कोणत्याही पक्षास अशा विवादाची बाब अर्जाद्वारे निरीक्षकाकडे लिहून पाठविता येईल आणि निरीक्षकास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, तिचा निर्णय देण्याचा अधिकार आहे.

(२) असा अर्ज लेखी असला पाहिजे व तो विहित करण्यात येईल अशा नमुन्याप्रमाणे असला पाहिजे, तसेच त्यासोबत विहित करण्यात येईल अशी फी पाठविली पाहिजे.

कंपनीस येणे असलेल्या आकारांची व भाड्याची वसुली.

**७-ञ.** (१) जेव्हा एखादा ग्राहक कंपनीने पुरविलेल्या गॅसबद्दल, किंवा मापयंत्र किंवा गॅसचे उष्णतामूल्य, दाब किंवा शुद्धता यांची परीक्षा करण्याबद्दल त्याच्याकडून कंपनीला येणे असलेला कोणताही आकार देण्याची हयगय करील अगर कंपनीने भाड्याने दिलेल्या कोणत्याही मापयंत्राबद्दल किंवा उपकरणाबद्दल (फिटिंग) कंपनीला येणे असलेले कोणतेही भाडे देण्याची हयगय करील तेव्हा, कंपनीस, पूर्ण सात दिवसांपेक्षा कमी नाही इतक्या मुदतीची लेखी नोटीस दिल्यानंतर, गॅसच्या जोडनलिका (सर्व्हिस पाईप्स) तोडून किंवा कंपनीस योग्य वाटेल अशा इतर साधनांचा अवलंब करून, अशा ग्राहकाच्या जागेत गॅस जाऊ देण्याचे बंद करण्याचा अधिकार आहे; अशा कृतीमुळे असा आकार किंवा भाडे दावा करून वसूल करण्याच्या कंपनीच्या हक्कास बाध येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये जेव्हा कंपनी कोणत्याही ग्राहकाच्या जागेत गॅस जाऊ देण्याचे बंद करील तेव्हा, कंपनीस, तिच्या अभिकर्त्यास किंवा कामगारास, भोगवटा करणाऱ्या व्यक्तीला चोवीस तासांची आगाऊ नोटीस दिल्यानंतर सकाळी नऊ व दुपारी चार या वेळेच्या दरम्यान अशा जागेत प्रवेश करण्याचा व कंपनीची मालमत्ता म्हणून असलेला कोणताही नळ, मापयंत्र, उपकरणें किंवा इतर वस्तू ताब्यात घेण्याचा व ती घेऊन जाण्याचा अधिकार आहे.

(३) जेव्हा ह्या अधिनियमाअन्वये कोणत्याही विवादाची बाब निरीक्षकाकडे पाठविण्यात आली असेल तेव्हा, निरीक्षक आपला निर्णय देईपर्यंत, किंवा ज्या तारखेस निरीक्षकाकडे विवादाची बाब पाठविण्यात आली होती त्या तारखेपासून एक महिना संपेपर्यंत, यांपैकी जी आधीची असेल त्या तारखेपर्यंत कंपनीने ह्या कलमान्वये मिळालेले अधिकार चालविता कामा नये.

(४) जेव्हा ह्या कलमाअन्वये कंपनीकडून गॅसचा पुरवठा बंद करण्यात आला असेल तेव्हा, विहित करण्यात येतील असे गॅसचे पुन्हा संयोजन करण्याबाबतचे आकार ग्राहकाकडून कंपनीस देण्यात येईपर्यंत गॅसचा पुरवठा पूर्ववत चालू करण्यास कंपनी बांधलेली असणार नाही.

निरीक्षकाच्या कामाबद्दल फी.

**७-ट.** (१) ह्या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींअन्वये निरीक्षकाने केलेल्या कामाबद्दल त्यास द्यावयाची फी विहित करण्याचा राज्य सरकारास अधिकार आहे. तसेच सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे, कोणत्याही फीची किंवा तिच्या कोणत्याही भागाची सूट देण्याची तरतूद करण्याचा राज्य सरकारास अधिकार आहे.

(२) अशी फी निरीक्षक ठरवील अशा पक्षाने निरीक्षकास दिली पाहिजे.

(३) पोट-कलम (२) अन्वये दिलेली फी राज्य सरकारकडे जमा करण्यात आली पाहिजे.

**७-ठ.** जेव्हा निरीक्षकाने निदेश दिल्याप्रमाणे कोणताही ग्राहक विहित करण्यात आलेली कोणतीही फी निरीक्षकाने अशा फीची लेखी मागणी केल्याच्या तारखेपासून सात दिवसांच्या आत देण्यात कसूर करील तेव्हा, अशा ग्राहकास गॅसचा पुरवठा करण्याचे बंद करण्याविषयी कंपनीस निदेश देण्याचा निरीक्षकाला अधिकार आहे; आणि असा पुरवठा पूर्ववत चालू करण्याविषयी निरीक्षकाकडून निदेश देण्यात येईपर्यंत कंपनीने अशा ग्राहकास गॅसचा पुरवठा करण्याचे बंद केले पाहिजे: *ग्राहकाने निरीक्षकाची फी देण्यात केलेली कसूर.*

परंतु, गॅसचा पुरवठा बंद करण्यात आल्यानंतर, विहित करण्यात येतील असे गॅसचे पुन्हा संयोजन करण्याबाबतचे आकार ग्राहकाकडून कंपनीस देण्यात येईपर्यंत, असा पुरवठा पूर्ववत चालू करण्यास कंपनी बांधलेली असणार नाही.

**७-ड.** कंपनीने ज्या व्यक्तींना गॅसचा पुरवठा केला असेल अशा व्यक्तींची एक यादी सादर करण्याविषयी कोणत्याही वेळी कंपनीस आदेश देण्याचा निरीक्षकास अधिकार आहे आणि कंपनीने अशा आदेशाचे पालन केले पाहिजे व तसेच निरीक्षक मागेल अशी इतर माहिती त्यास पुरविली पाहिजे. *ग्राहकांची यादी.*

**७-ढ.** (१) बसविलेल्या गॅसच्या जोडकामाच्या कोणत्याही भागामुळे किंवा कोणत्याही उपकरणामुळे गॅसचा अपव्यय होत आहे किंवा होण्याचा संभव आहे किंवा ग्राहकाच्या जागेत बसविलेल्या मापयंत्रावर जास्त भार पडत आहे किंवा पडण्याचा संभव आहे असे निरीक्षकाचे मत असेल तर, जोडकामाच्या अशा भागाचा किंवा उपकरणाचा उपयोग करण्याचे बंद करण्याविषयी कोणत्याही ग्राहकाला निदेश देण्याचा निरीक्षकास अधिकार आहे आणि अशा ग्राहकाने याबाबत दिलेल्या निरीक्षकाच्या निदेशाचे पालन केले पाहिजे. *निरीक्षकाने ग्राहकास निदेश देणे.*

(२) जेव्हा पोट-कलम (१) अन्वये निरीक्षकाने दिलेल्या कोणत्याही निदेशाचे पालन करण्यात ग्राहक कसूर करील तेव्हा, अशा ग्राहकास गॅसचा पुरवठा करण्याचे बंद करण्याविषयी कंपनीस निदेश देण्याचा निरीक्षकास अधिकार आहे आणि असा पुरवठा पूर्ववत चालू करण्याविषयी निरीक्षकाकडून कंपनीस निदेश देण्यात येईपर्यंत, कंपनीने अशा ग्राहकास गॅसचा पुरवठा करण्याचे बंद केले पाहिजे; मात्र या कृतीमुळे ग्राहक ज्या इतर कोणत्याही शिक्षेस पात्र असेल त्यास बाध येणार नाही:

परंतु, गॅसचा पुरवठा बंद करण्यात आल्यानंतर, विहित करण्यात येतील असे गॅसचे पुन्हा संयोजन करण्याबाबतचे आकार ग्राहकाकडून कंपनीस देण्यात येईपर्यंत असा पुरवठा पूर्ववत चालू करण्यास कंपनी बांधलेली असणार नाही.

**७-ण.** राज्य सरकारास, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, योग्य रीतीने पात्रताप्राप्त झालेल्या व्यक्तीची गॅस निरीक्षक म्हणून नेमणूक करण्याचा अधिकार आहे आणि अशा रीतीने नेमलेल्या गॅस निरीक्षकाने, राज्य सरकार निदेश घालून देऊन अशा निर्बंधास अधीन राहून, ह्या अधिनियमाअन्वये निरीक्षकास असलेले अधिकार चालविले पाहिजेत व त्याची कामे केली पाहिजेत. कोणत्याही व्यक्तीची निरीक्षक म्हणून नेमणूक होण्यास आवश्यक असलेल्या पात्रता ह्या विहित करण्यात येतील अशा प्रकारच्या असतील. *निरीक्षकाची नेमणूक.*

निरीक्षकाच्या निर्णयावर अपील.

**७-त.** (१) ह्या अधिनियमाअन्वये निरीक्षकाने दिलेल्या निर्णयावर राज्य सरकारकडे किंवा राज्य सरकार राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे याबाबत नेमील अशा अधिकाऱ्याकडे अपील करता येईल.

(२) असे प्रत्येक अपील, निरीक्षकाने निर्णय दिल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत केले पाहिजे.]

कंपनीने उल्लंघन केल्याबद्दल शिक्षा.

[१][८. जर कंपनी, वाजवी सबब असल्याखेरीज—अशी सबब असल्याचे सिद्ध करण्याचा बोजा कंपनीवर राहील—ह्या अधिनियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करील तर, तिला, दोषी ठरविण्यात आले असता, रुपये १,००० पर्यंत दंडाची शिक्षा होईल आणि असे उल्लंघन चालू राहिल्याच्या बाबतीत अशा पहिल्या उल्लंघनांबद्दल झालेल्या दोषसिद्धीनंतर ज्या ज्या दिवशी असे उल्लंघन चालू राहील त्या प्रत्येक दिवसाबद्दल आणखी रुपये ५० पर्यंत दंडाची शिक्षा होईल.]

कंपनीने कसूर केल्याबद्दल प्रमुख अधिकारी जबाबदार असणे.

**९.** ह्या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीअन्वये किंवा तद्नुसार कंपनीने जी कोणतीही गोष्ट करणे भाग आहे ती करण्याविषयी कंपनीचा प्रमुख अधिकारी बांधलेला असेल आणि अशी कोणतीही गोष्ट करण्यात कसूर झाल्यास तो त्याबद्दल जातीने जबाबदार राहील.

**स्पष्टीकरण.**—ह्या कलमाच्या प्रयोजनांकरिता कंपनीचा प्रमुख अधिकारी म्हणजे कंपनीचा संचालक, चिटणीस, खजिनदार, व्यवस्थापक किंवा अभिकर्ता हा होय.

ग्राहकाने कसूर केल्याबद्दल शिक्षा.

[२][**९-क.** जर एखादा ग्राहक, वाजवी सबब असल्याखेरीज—अशी सबब असल्याचे सिद्ध करण्याचा बोजा अशा ग्राहकावर राहील—ह्या अधिनियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदीअन्वये निरीक्षकाने त्यास दिलेल्या कोणत्याही निदेशाचे पालन करण्यात कसूर करील तर, त्यास, दोषी ठरविण्यात आले असता, रुपये १०० पर्यंत दंडाची शिक्षा होईल आणि, अशी कसूर चालू राहिल्यास अशा पहिल्या कसुरीबद्दल झालेल्या दोषसिद्धीनंतर ज्या ज्या दिवशी अशी कसूर चालू राहील त्या प्रत्येक दिवसाबद्दल आणखी रुपये १० पर्यंत दंडाची शिक्षा होईल.

निरीक्षक हा लोकसेवक असणे.

**९-ख.** कलम ७-ण अन्वये राज्य सरकारने नेमलेला निरीक्षक हा भारतीय दंड संहिता, कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक आहे असे समजले पाहिजे.

दावे व खटले याबाबत निस्तारण.

**९-ग.** ह्या अधिनियमाअन्वये सद्भवनापूर्वक केलेल्या किंवा जे करण्याचा आशय आहे अशा कोणत्याही कृत्याबद्दल निरीक्षकाविरुद्ध किंवा त्याच्या कोणत्याही मदतनीसाविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कारवाई दाखल करता कामा नये.]

---

[१] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम ५ द्वारे मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ६ द्वारे कलमे ९-क, ९-ख व ९-ग समाविष्ट करण्यात आली.

**१०.** [१][राज्य] सरकारला, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे जी कोणतीही व्यक्ती [२][महाराष्ट्र राज्यातील] कोणत्याही क्षेत्रात गॅस तयार करते किंवा त्याचा पुरवठा करते त्यास ह्या अधिनियमाची तरतूद लागू करण्याचा अधिकार आहे. गॅस तयार करणाऱ्या किंवा त्याचा पुरवठा करणाऱ्या व्यक्तींना प्रस्तुत अधिनियम लागू करणे.

**११.** (१) [१][राज्य] सरकाराला, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, ह्या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्यासाठी नियम करण्याचा अधिकार आहे. नियम.

(२) विशेषेकरून व वरील तरतुदींच्या सामान्यतेस बाध येऊ न देता, असे नियम पुढील सर्व किंवा कोणत्याही गोष्टींबाबत करता येतील :—

(क) कलम ३, पोट-कलम (१) अन्वये कंपनीने [१][राज्य] सरकाराला आपल्या उपक्रमाच्या हिशोबांचे पत्रक ज्या दिनांकास किंवा दिनांकापूर्वी सादर केले पाहिजे तो दिनांक; असे पत्रक ज्या दिनांकापर्यंत तयार केले पाहिजे तो दिनांक व अशा पत्रकात जो तपशील असला पाहिजे तो तपशील ;

(ख) कलम ३, पोट-कलम (२) अन्वये हिशोबाच्या पत्रकाच्या प्रती जास्तीत जास्त ज्या किंमतीस विकता येतील ती किंमत ;

[३][(ग) गॅस उत्पन्न करणे, तो दुसरीकडे नेणे, त्याचा पुरवठा करणे व त्याचा उपयोग करणे;

(घ) कलम ७-घ, पोट-कलम (२) किंवा कलम ७-ज, पोट-कलम (२) याअन्वये परीक्षा केल्याबद्दल कंपनीस द्यावयाच्या आकाराची जास्तीत जास्त रक्कम;

(ङ) कलम ७-छ अन्वये नवीन संयोजने देण्याची रीत;

(च) कलम ७-झ अन्वये करावयाच्या अर्जाचा नमुना व अशा अर्जासोबत द्यावयाची फी;

(छ) कलम ७-ट अन्वये निरीक्षकास त्याच्या कामाबद्दल द्यावयाची फी;

---

[२] महाराष्ट्र विधि (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम ७ द्वारे हे खंड व पोट-कलम (३) समाविष्ट करण्यात आले.

(ज) कलमे ७-ज, ७-ठ व ७-ढ याअन्वये कंपनीस गॅसचे पुन्हा संयोजन केल्याबद्दल द्यावयाचे आकार;

(झ) गॅसची जोडकामे बसविणे, मापयंत्रे किंवा उपकरणे बसविणे आणि त्यांची तपासणी करणे व ती सुस्थितीत राखणे;

(ञ) मापनयंत्रे व अनुलेखकयंत्रे यांची तपासणी;

(ट) विहित केली पाहिजे किंवा विहित करता येईल अशी कोणतीही इतर बाब.

(३) या अधिनियमाअन्वये नियम करण्याचे अधिकार हे आगाऊ प्रसिद्ध करण्याच्या अधीन असेल].

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११००६